नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २०७ Issue - 207 | वार बुधवार दि. १७ डिसेंबर २०२५ Blow- Wednesday Date 17 December 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## क्रीडामंत्री माणिकराव कोकाटेंना २ वर्षांची शिक्षा

### सदनिका घोटाळा प्रकरण; जिल्हा कोर्टाचा निकाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे पुन्हा अडचणीत आले आहेत. कारण, यापूर्वी प्रथम वर्ग न्यायालयाने त्यांना सुनावलेली शिक्षा वरच्या कोर्टात कायम ठेवण्यात आली आहे. शासकीय कोट्यातील १० टक्के सदनिका गैरव्यवहारप्रकरणी दोन वर्षे कारावास आणि १० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा नाशिक जिल्हा सत्र न्यायलयात कायम ठेवण्यात आल्याने क्राडी मंत्र्यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. मुख्यमंत्री कोट्यातून दिल्या जाणाऱ्या सदनिका या बनावट दस्तऐवज तयार करून लाटल्या प्रकरणात कृषीमंत्री ड. माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ विजय कोकाटे यांना प्रत्येकी दोन वर्षांचा कारावास आणि ५० हजार रुपये दंडाची न्यायालयाने सु-नावली होती.



माणिकराव कोकाटे गेल्या काही महिन्यापासून चांगलेच अडचणीत आले असून विधिमंडळ अधिवेशन सुरू असताना म ोबाईलमध्ये पत्त्याची गेम,रम्मी खेळताना-चा त्यांचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. मात्र, आपण रम्मी खेळत नव्हतो, तर मोबाईलवर ते पॉपअप आल्याचे सांगत त्यांनी हात झटकले होते. मात्र, त्यांच्याकडून कृषिमंत्रीपदाचा पदभार काढून घेत त्यांना क्रीडा मंत्रिपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यातच, सदनिका घोटाळाप्रकरणी न्यायालयाने माणिकराव कोकाटे यांना २ वर्षे कारावास आणि ५० हजारांच्या दंडाची शिक्षा ठोठावली होती. आता, जिल्हा सत्र न्यायालयाने ही शिक्षा कायम ठेवली आहे.

प्रथम वर्ग न्यायालयाने शिक्षा सुनावल्यानंतर विरोधकांकडून माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात होती. त्यावेळी, या शिक्षेला आव्हान देत कोकाटे यांनी जिल्हा सत्र न्यायालयात धाव घेतली होती. त्यामुळे माणिकराव कोकाटे यांना दिलासा मिळणार की त्यांच्या अडचणीत वाढ होणार? याकडे आता सर्वांचे लक्ष होते. मात्र, प्रथम वर्ग न्यायालयाने दिलेली शिक्षा, जिल्हा सत्र न्यायालयाकडून कायम ठेवण्यात आली आहे. जिल्हा सत्र न्यायाधीश पी एम बदर यांनी माणिकराव कोकाटे यांना पुन्हा एकदा संबंधित प्रकरणात शिक्षा सुनावल्याने कोकाटेंच्या अडचणी कायम राहिल्या आहेत.

नाशिक शहरातील उच्चभ्रू परिसरात माणिकराव कोकाटे यांनी ३० वर्षांपूर्वी अल्प उत्पन्न गटातून सदनिका मिळवली होती. स्वत:सह भाऊ विजय कोकाटे, पोपट सोनवणे आणि प्रशांत गोवर्धने या चार जणांनी कॅनडा कॉर्नर भागात निर्माण व्ह्यू अपार्टमेंटमध्ये मुख्यमंत्री कोट्यातून अल्प उत्पन्न गटासाठीच्या सदनिका प्राप्त केल्या होत्या. यानंतर तत्कालीन दिवंगत राज्यमंत्री तुकाराम दिघोळे यांच्या तक्रारीवरून जिल्हा प्रशासनाने सदनिका वाटपाची चौकशी केली होती. गुरुवारी (दि. २०) या प्रकरणात नाशिक न्यायालयाने माणिकराव कोकाटे यांच्यासह त्यांच्या भावाला प्रत्येकी दोन वर्षांचा कारावास आणि ५० हजारांचा दंड अशी शिक्षा सुना-वली आहे.

## एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला ५२ जागांचा प्रस्ताव, भाजपकडून आकडेवारी मांडत पहिली ऑफर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील आगामी म हापालिका निवडणुकांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (ऊर्शींशपवीर ऋरव-परींळी) यांनी महायुतीची घोषणा केली असून मुंबईतही एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि भाजप एकत्रित निवडणूक लढणार आहे. मुंबई महापालिकेवर महायुतीचाच महौपार होईल, महायुतीचाच भगवा फडकेल असा दावा भाजप (इगझ) नेत्यांकडून केला जात आहे. त्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने मतदानाची तारीख जाहीर केल्यानंतर राजकीय पक्षातील कामाला वेग आला असून महायुती व ठाकरे बंधूंमध्ये मुंबई महापालिकेसाठी जागावाटपाची चर्चा अंतिम टप्प्यात आली आहे. मुंबई महापालिकेसाठी भाजपकडून शिवसेनेला केवळ ५२ जागांचा प्रस्ताव देण्यात आल्याची वरिष्ठ विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे.



मुंबई महापालिकेच्या २२७ जागांसाठी निवडणूक होत असून महायुतीत भाजप आणि शिवसे-नेची ताकद मोठी आहे. त्यामुळे, दोन्ही पक्षाकडून जागावाटपासंदर्भात आज पहिली बैठक पार पडली. या बैठकीत भाजपने शिवसेनेला केवळ ५२ जागांचा प्रस्ताव दिल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे शिवसेनेकडून आपणास १२५ जागा मिळाव्या यासाठी आग्रह आहे. भाजपकडून थेट आकडेवारी सांगत वार्डातील जागांची यादीच समोर ठेवण्यात आली. त्यानुसार, एकनाश शिंदेंच्या शिवसेनेची ताकद असलेल्या ५२ जागा शिवसेनेला सोडण्याची तयारी भाजपने दर्शवली आहे. दरम्यान, एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत २०१७ सालचे जवळपास ४७ नगरसेवक आहेत. भाजप आणि शिवसेनेत परवा वॉर्डनिहाय चर्चा होणार असून ज्याद्वारे जागावाटप अंतिम होणार आहे.

एकनाथ शिंदेंकडून २२७ जागांसाठी मुलाखती सुरू

मुंबई महापालिका निवडणुकांसाठी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेनंही कंबर कसली असून एकनाथ शिंदे स्वत: शिवसेनेसाठी मुंबईच्या २२७ वॉर्डमधील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेणार आहेत. गुरुवारपासून या मुलाखतींना सुरुवात होणार असल्याची माहिती असून मुंबईमधील सर्व विभागांमध्ये इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीसाठीच्या अर्जाचं वाटपही सुरू करण्यात आलं आहे. भाजपकडून केवळ ५२ जागांचा प्रस्ताव शिवसेनेला देण्यात आला असतानाही, शिवसेनेकडून संपूर्ण २२७ जागांसाठी मुलाखती घेण्याची तयारी सुरू केल्याने महायुतीतील जागावाटप नेमकं कसं होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, पुढील काही दिवसांत यासंदर्भाने निर्णय घेणे अपेक्षित आहे. कारण, १५ जानेवारीला मतदान आणि १६ जानेवारी रोजी महापालिका निवडणुकांसाठी निकाल जाहीर होणार आहे.

## आरोग्य सेवेत 'ए आय' तंत्रज्ञानाचा वापर करणार : प्रकाश आबिटकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याच्या सार्वजनिक आरोग्य सेवेत आता आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करण्यात येणार आहे. तशी माहिती राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. सार्वजनिक आरोग्य सेवेत 'एआय' (ख) तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करावा अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. 'वर्षा' निवासस्थानी पार पडलेल्या आरोग्य विभागाच्या बैठकीत ते मार्गदर्शन करत होते.

सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक लोकाभिमुख करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वाचा असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

तसेच या बैठकीत 'समग्र' संस्थेच्या वतीने आरोग्य सेवा बळकटीकरण अंतर्गत आरोग्य संस्थांचे स्टार रेटिंग, आरोग्य समीक्षा, आरोग्य हेल्पलाइन, आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण तसेच रिव्ह्यू इत्यादी बाबींचे सादरीकरणही करण्यात आले.

आरोग्यमंत्र्यांच्या मागणीवर मुख्यमंत्री सकारात्मक

'आपले गाव, आरोग्य संपन्न गाव' योजना, पॉलिएटिव्ह केअर, सिकलसेल, वैद्यकीय अधिकारी भरती प्रक्रिया सुलभ करणे, वैद्यकीय अधिकारी मानधन वाढ, तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समावेशन जलद होणे, आयुष संचालक, प्रशिक्षण संचालक, नर्सिंग ही पदे निर्माण करण्याबाबत मागणी करण्यात आली. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकरांच्या या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणीसांनी सकारात्मक प्रतिसाद देत आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

## यमुना एक्स्प्रेस वेवर भीषण अपघात, १३ जणांचा दुर्दैवी अंत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : उत्तर प्रदेशातील म थुरा येथे आज पहाटे यमुना एक्स्प्रेस वे वर झालेल्या भीषण अपघातात १३ जणांचा मृत्यू झाला असून २५ हून अधिक प्रवासी जखमी झाले आहेत. दाट धुक्यामुळे हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती असून, आग्रा ते नोएडा दिशेने जाणाऱ्या ८ बस आणि ३ कार एकमेकांवर आदळल्या. धडक इतकी जोरदार होती की, काही वाहनांना भीषण आग लागली.

हा अपघात आग्रा-नोएडा मार्गावर बलदेव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खडेहरा गावाज-वळ, माईलस्टोन क्रमांक १२७ जवळ घडला. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, पो-लीस आणि प्रशासनाचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. बचावकार्य युद्धपातळीवर राबवण्यात आले. अपघातात जखमी झालेल्या २५ प्रवाशांना रुग्णवाहिकांद्वारे जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मृतांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले असून, बसमधील उर्वरित प्रवाशांना त्यांच्या ठिकाणी पोहोचवण्यासाठी प्रशासनाकडून पर्यायी वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे.

प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, दाट धुक्यामुळे काहीच दिसत नव्ह-ते. एकामागून एक वाहनांची धडक झाली आणि काही क्षणांतच वाहनांना आग लागली. अनेक प्रवासी वाहनांमध्येच अडकले, तर काहींनी प्रसंगावधान राखत बसमधून उडी मारून आप-ला जीव वाचवला. मात्र आत अडकलेल्या काही प्रवाशांचा आगीत होरपळून मृत्यू झाला. अपघातातून बचावलेल्या कानपूर येथील सौरभ या प्रवाशाने सांगितले की, धुके इतके दाट होते की समोरचं काहीच दिसत नव्हतं. अचानक मोठा आवाज झाला आणि बस एकमेकांवर आदळल्या. त्यानंतर काही वेळातच आग लागली.

मथुरा येथील जिल्हाधिकारी चंद्रप्रकाश सिंह यांनी या अपघातात १३ जणांचा मृत्यू झाल्याची अधिकृत पुष्टी केली आहे. त्यांनी सांगितले की, बस आणि कारच्या धडकेत आग लागून मोठी जीवितहानी झाली. मुख्यमंत्री यांनी या घटनेची दखल घेत जखमींवर तातडीने योग्य उपचार करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच मृतांच्या नातेवाइकांना प्रत्येकी २ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या भीषण अपघातामुळे यमुना एक्स्प्रेस वे वर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. मात्र, बचावकार्य पूर्ण झाल्यानंतर हळूहळू वाहतूक पूर्ववत करण्यात येत आहे.

## काँग्रेस आणि 'वंचित'ची आघाडी होण्याची दाट शक्यता, पडद्यामागे हालचाली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोठी बातमी समोर येत आहे. काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी पक्षाची आघाडी होण्याची दाट शक्यता आहे. मुंबई वगळता इतर सर्व २८ महापालिकांच्या निवडणुकीत काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी एकत्र निवडणूक लढण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे महायुतीसाठी महापालिका निवडणुकीत नवं चॅलेंज उभं राहण्याची शक्यता आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी काल वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांची मुंबईत येऊन भेट घेतली. या भेटीत एकत्र महापालिका निवडणुका लढण्याबाबत निर्णय झाला. काँग्रेसचा वंचितसोबत जागावाटपाचा लवकरच फॉर्म्युला ठरणार आहे. विशेष म्हणजे एकीकडे ठाकरे बंधू एकत्र येताना दिसत आहेत. तर दुसरीकडे वंचित आणि काँग्रेस एकत्र लढण्याच्या तयारीत आहेत.

महापालिका निवडणुका जाहीर झाल्यानंतर प्रत्येक पक्षाच्या गोटात हालचालींना वेग आला आहे. प्रत्येक पक्षात अतिशय वेगवान घडामोडी सुरु आहेत. बैठका घेतल्या जात आहेत. उमेदवारांना अर्जांचं वाटप केलं जात आहे. काही ठिकाणी इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या जात आहेत. या निवडणुकीत कुणासोबत युती आणि आघाडी करायची? याबाबतही नेतेमंडळींची चर्चा सुरु आहे. अशीच चर्चा काँग्रेसचे हर्षवर्धन सपकाळ आणि वंचितचे प्रकाश आंबेडकर यांच्यात झाली. या बैठकीत आघाडीचा निर्णय झाल्याचं वृत्त 'एबीपी माझा'ने दिलं आहे.



काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीने एकत्र यावेत यासाठी अनेक नेत्यांकडून पडद्यामागे प्रयत्न करण्यात आल्याची चर्चा आहे. अखेर या प्रयत्नांना यश मिळताना दिसत आहे. मुंबईत दोन्ही पक्ष एकत्र लढणार नसले तरी उर्वरित ठिकाणी दोन्ही पक्षांची आघाडी होणार असल्याची माहिती आहे. यासाठी जागावाटपाची पहिल्या टप्प्यातील बैठक काल पार पडली आहे. आगामी काळात याबाबत महत्त्वाचे निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे.

दरम्यान, काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष आहे. विरोधकांमधला हा महत्त्वाचा पक्ष आहे. पण राज्यात वंचित बहुजन आघाडीची देखील ताकद आहे. तळागळापर्यंत हा पक्ष पोहोचलेला आहे. मतांचं विभाजन झालं नाही तर हा पक्ष देखील मोठी मजल मारु शकतो. याआधी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत ते आपल्याला बघायला मिळालं होतं. वंचित आणि काँग्रेसची आघाडी झाली तर काही ठिकाणी महायुतीसाठी मोठं चॅलेंज असणार आहे. त्याठिकाणी महायुती कदाचित केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या रिपब्लिक पक्षाला ताकद देऊ शकते. त्यामुळे तिथे कशी लढत होते? ते पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.

### राष्ट्रवादीचे नेतृत्व नवाब मलिकांकडेच; राष्ट्रवादीची ५० जागांवर तयारी पूर्ण

## मुंबईत नवाब मलिकांकडे नेतृत्व द्याल तर राष्ट्रवादीसोबत युती नाही; भाजपची स्पष्ट भूमिका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : एकीकडे मनसे अध्यक्ष राज ठाकरेंमुळे मुंबईत मविआमध्ये बिघाडी झाली आहे, तर दुसरीकडे राष्ट्रवादीच्या नवाब मलिकांमुळे (छुरल चरश्रळज्ञ) महायुतीत मिठाचा खडा पडण्याची चिन्हं आहेत. नवाब मलिकांना सोबत घेण्यास भाजप राजी नाही. त्यामुळे मुंबईत केवळ शिंदेंची शिवसेना आणि भाजप घरोबा करणार असल्याचं जवळपास निश्चित झालं आहे.

मुंबई महापालिकेसाठी नवाब मलिक राष्ट्रवादी काँग्रेसचे नेतृत्व करणार असतील तर भाजप-राष्ट्रवादीसोबत मुंबईत युती करणार नाही असं भाजप प्रवक्ते नवनाथ बन, आशिष शेलार आणि अमित साठम यांनी स्पष्ट केलं आहे. त्यामुळे मुंबईमध्ये अजितदादांच्या राष्ट्रवादीला स्वतंत्र लढावं लागणार आहे.

नवाब मलिकांना आधी भाजप-ने विरोध केला, त्यानंतर शिंदेंच्या शिवसेनेनेही तीच री ओढली. नवाब मलिकांबाबत जी भूमिका भाजपची तीच शिवसेनेची असल्याचं शिंदेंच्या शिवसे-नेचे माजी खासदार राहुल शेवाळे यांनी म्हंटलय.



ज्या नबाव मलिकांमुळे महायुतीमध्ये तणाव निर्माण झाला आहे त्यांच्यावरच अजित पवारांनी मुंबई म हापालिकांची पूर्ण जबाबदारी टाकली आहे. मलिकांच्या नेतृत्वात राष्ट्रवादीनं तातडीची बैठक घेतली. या बैठकीला झिशान सिद्दीकी आणि सना मलिकही हजर होते. मुंबईत महायुती म्हणून लढण्यास विरोध होत असताना पुढील रणनीती नेमकी काय असणार यावर या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती आहे.

नवाब मलिकांना भाजपने विरोध केल्यानंतर राष्ट्रवादीने महायुतीसोबत किंवा महायुती शिवाय लढण्याची तयारी ठेवली आहे. मुंबईत किमान ५० जागा लढवण्याची तयारी राष्ट्रवादीने केली असल्याची माहिती आहे. तर महायुतीत राहायचं की नाही याचा निर्णय अजित पवारांकडे सोपवण्यात आल्याची माहिती आहे.

नवाब मलिकांच्या नावामुळे राष्ट्रवादीला डावलत मुंबई महापालिकेसाठी भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेची पहिली संयुक्त बैठक पार पडली. यावेळी मुंबईत १५० हून अधिक जागा जिंकण्याचा निर्धार करण्यात आला. तसंच येत्या एक ते दोन दिवसात अंतिम जागावाटप पूर्ण करणार असल्याचं आशिष शेलारांनी स्पष्ट केलं.

दरम्यान, ज्या जागेवर पक्षाचे विद्यमान नगरसेवक आहेत ती जागा त्याच पक्षाला देण्यात यावी याविषयी या बैठकीत एकमत झाल्याची माहिती पुढे आली. तर काही जागांची अदलाबदली होण्याची शक्यताही सूत्रांनी वर्तवली. गुरुवारी पुन्हा एकदा म हायुतीच्या जागावाटपाबाबत मॅरेथॉन बैठक पार पडणार आहे. तसंच जागावाटपाच्या प्रक्रियेतून महायुतीची प्रतिमा मलिन होऊ नये आणि कोणताही वाद बाहेर जाऊ नये यासाठी विशेष खबरदारी घेण्याचा निर्णय झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### तिढा कायम

मुंबई महापालिकेच्या २२७ जागांसाठी निवडणूक होत असून महायुतीत भाजप आणि शिवसेनेची ताकद मोठी आहे. त्यामुळे, दोन्ही पक्षाकडून जागावाटपासंदर्भात आज पहिली बैठक पार पडली. या बैठकीत भाजपने शिवसेनेला केवळ ५२ जागांचा प्रस्ताव दिल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे शिवसेनेकडून आपणास १२५ जागा मिळाव्या यासाठी आग्रह आहे. भाजपकडून थेट आकडेवारी सांगत वार्डातील जागांची यादीच समोर ठेवण्यात आली. त्यानुसार, एकनाश शिंदेंच्या शिवसेनेची ताकद असलेल्या ५२ जागा शिवसेनेला सोडण्याची तयारी भाजपने दर्शवली आहे. दरम्यान, एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत २०१७ सालचे जवळपास ४७ नगरसेवक आहेत. भाजप आणि शिवसेनेत परवा वॉर्डनिहाय चर्चा होणार असून ज्याद्वारे जागावाटप अंतिम होणार आहे. राज्यातील आगामी महापालिका निवडणुकांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीची घोषणा केली असून मुंबईतही एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि भाजप एकत्रित निवडणूक लढणार आहे. मुंबई महापालिकेवर महायुतीचाच महौपार होईल, महायुतीचाच भगवा फडकेल असा दावा भाजप नेत्यांकडून केला जात आहे. त्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने मतदानाची तारीख जाहीर केल्यानंतर राजकीय पक्षातील कामाला वेग आला असून महायुती व ठाकरे बंधूंमध्ये मुंबई महापालिकेसाठी जागावाटपाची चर्चा अंतिम टप्प्यात आली आहे. मुंबई महापालिकेसाठी भाजपकडून शिवसेनेला केवळ ५२ जागांचा प्रस्ताव देण्यात आल्याची वरिष्ठ विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विषारी फुत्कार : लोकशाहीच्या अंगणात पसरलेली असहिष्णुतेची झाड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोकशाही ही केवळ निवडणुकांची प्रक्रिया नसून ती संवाद, संयम, सहिष्णुता आणि लोकाभिमुखतेच्या मूल्यांवर उभी असलेली व्यवस्था आहे. मात्र, सत्तेच्या शिखरावर बसलेले काही लोक जेव्हा शब्दांचा संयम गमावतात, तेव्हा ते शब्द केवळ वक्तव्य राहत नाहीत, तर समाजमनाला विषारी फुत्कार देणारे नाग बनतात. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अलीकडील काही विधानं ही त्याच प्रकारची विषारी फुत्कार असल्याची भावना सर्वसामान्य जनतेत रुजताना दिसते. सत्तेतील अहंकार आणि शब्दांची धार अजित पवार हे राज्यातील अनुभवी, ताकदवान आणि प्रभावी नेते आहेत, यात शंका नाही. परंतु अनुभव जितका मोठा, तितकी जबाबदारीही मोठी असते. दुर्दैवाने, अनेक वेळा त्यांच्या भाषणांतून उमटणारी आक्रमकता, चिडचिड, उपरोध आणि धमकीचा सूर हा लोकशाही संस्कृतीला शोभणारा नाही.

मी काय करतो ते बघाच, जास्त बोलाल तर अशा शब्दांतून संवाद नव्हे, तर दडपशाहीचा इशारा दिला जातो. जनतेशी संवाद की जनतेवर दडपण?



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

लोकप्रतिनिधींचे शब्द हे समाजासाठी दिशादर्शक असतात. मात्र जेव्हा उपमुख्यमंत्री सार्वजनिक मंचावरून संतप्त, अवमानकारक आणि असहिष्णू भाषेत बोलतात, तेव्हा ते केवळ विरोधकांनाच नव्हे तर सामान्य नागरिकांनाही भयभीत करतात.

शेतकरी, कर्मचारी, आंदोलनकर्ते किंवा पत्रकार यांच्याबाबत वापरलेली भाषा ही लोकशाहीतील संवादाच्या परंपरेवर घाला घालणारी ठरते. विषारी फुत्कारांचे दुष्परिणाम राजकीय नेत्यांचे शब्द समाजमनावर खोल परिणाम करतात. आक्रमक वक्तव्यांमुळे समाजात द्वेष आणि तणाव वाढतो, लोकशाही मूल्यांवरचा विश्वास डळमळीत होतो, तरुण पिढीसमोर चुकीचा आदर्श उभा राहतो, प्रशासनावर दबाव आणि भीतीचे वातावरण निर्माण होते. आज जे शब्द सत्ताधाऱ्यांकडून येतात, ते उद्या रस्त्यावर उतरून हिंसेचे रूप धारण करू शकतात, याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

टीका म्हणजे शत्रुत्व नव्हे, लोकशाहीत टीका ही शासनाची शत्रू नसून तिची ताकद असते. परंतु टीकेला विरोध करण्याऐवजी धमकी, उपहास किंवा अवहेलना केली गेली, तर ते सत्तेच्या असुरक्षिततेचे लक्षण ठरते. अजित पवार यांच्याकडून अपेक्षा आहे की त्यांनी टीकेकडे शत्रुत्व म्हणून न पाहता आत्मपरीक्षणाची संधी म्हणून पाहावे. खरे नेतृत्व तेच, जे कठोर प्रश्नांनाही संयमाने सामोरे जाते. शब्दांनी जखमा करणं सोपं असतं, पण शब्दांनी दिलासा देणं हेच खऱ्या लोकनेत्याचं लक्षण आहे. आज राज्य आर्थिक, सामाजिक आणि नैतिक आव्हानांच्या उंबरठ्यावर उभं आहे. अशा काळात उपमुख्यमंत्र्यांकडून विषारी फुत्कार नव्हे, तर संवादाचे शीतल वारे अपेक्षित आहेत, हीच नेतृत्वाची खरी परीक्षा आहे.

शेवटचा सवाल, सत्ता ही तात्पुरती असते, पण शब्दांची जखम कायमची राहते. अजित पवार यांचे शब्द इतिहासात धमकीचे फुत्कार म्हणून नोंदले जातील की लोकशाहीचे मार्गदर्शक म्हणून हा निर्णय त्यांच्या आजच्या भाषेवर अवलंबून आहे. पण लोकशाही वाचवायची असेल, तर सत्ताधाऱ्यांनी आधी आपल्या शब्दांवर नियंत्रण ठेवणे अत्यावश्यक आहे.

# महाराष्ट्राच्या पत्रकारितेतील कोहिनूर हिराः न्यूज अँकर श्री. विलास बडे सर...

**(विलास बडे सर.... म्हणजे महाराष्ट्राच्या मातीतील बावन्नकशी सोनं..जसा देहाचा तसा दिलाचा व्यक्तिमत्व...)**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पत्रकारिता हे आपल्या लोकशाहीच्या मजबुतीकरणासाठीचा भक्कम पाया संबोधला जातो.न्हवे तो आहेच. आपल्या भारत देशाच्या पारतंत्र्याच्या काळामध्ये समाजातील वाईट प्रथा, परंपरेवर प्रहार करण्यासाठी अनेकांनी पत्रकारितेच्या रूपातून आपली लेखणी झिजवली आहे. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या दर्पण या वृत्तपत्रापासून सुरू झालेल्या या मराठी वृत्तपत्र पत्रकारितेच्या प्रवासामध्ये गोपाळ गणेश आगरकर , म. गो. रानडे, महात्मा ज्योतिबा फुले, लोकमान्य टिळक, डॉक्टर. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सह अनेकांनी आपल्या धारदार लेखणीतून समाजातील अनिष्ट प्रथा परंपरेवर आणि इंग्रजी सत्ते विरोधात आवाज उठवला होता. संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे यांच्या लेखणीने आणि वाणीने संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या लढ्यामध्ये नवचेतना निर्माण झाली. महाराष्ट्र पुढे दिल्ली झुकली आणि १ मे १९६० या दिवशी आपला महाराष्ट्र जन्मास आला. ही ताकद आहे प्रामाणिक, निडर ,निर्भीड पत्रकारितेची आणि पत्रकारांची. पत्रकारिता ही अपुऱ्या माहितीवर आधारित नसावी, ती कोणाचा आकस ठेवणारी, कोणाबद्दल आप परभाव मानणारी नसावी. ती डोळस असावी आणि सत्याचा मागवा घेणारी असावी. पत्रकारिता ही स्वतःच्या स्वार्थासाठी करणारी नसावी. हाच विचार डोळ्यासमोर ठेवून

महाराष्ट्राच्या मातीमध्ये राष्ट्राच्या उद्धाराची बाजू घेऊन पत्रकारिता करणारे अनेक पत्रकार आहेत. त्यामध्ये, कुमार केतकर, कुमार सप्तर्षी, राजीव खांडेकर, उदय निरगुडकर, निखिल वागळे, प्रसन्न जोशी, मंदार फणसे, ज्ञानदा कदम यांच्यासह अनेक प्रामाणिक पत्रकारांची रांग आहे. त्यामधीलच महाराष्ट्राच्या पत्रकारितेतील निडर, निर्भिड, सडेतोड आणि पराकोटीचे संवेदनशील व्यक्तिमत्व म्हणजे आयबीएन लोकमत या न्यूज वाहिनीचे श्री. विलास बडे सर.

मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यापासून ते आयबीएन लोकमत सारख्या नावाजलेल्या टीव्ही वाहिनीच्या पत्रकारितेतील मुख्य चेहरा होण्यापर्यंतचा त्यांचा प्रवासा हा अनेकांना अचंबित करणारा आणि सर्वांसाठी तितकाच प्रेरणादायी आहे. श्री.विलास बडे महाराष्ट्रातील सर्वसामान्य शोषित वंचित पीडित जनतेचा आवाज आहेत. त्यांचा बडे मुद्दे हा कार्यक्रम तर राजकीय, सामाजिक, धार्मिक शैक्षणिक, सांस्कृतिक अव्यवस्थेची टराटरा चिडफाड करणारा असतो. या कार्यक्रमांमध्ये कोण कितीही मोठा असेना का त्याची भीडभाड न ठेवता सत्याच्या बाजूने प्रामाणिक प्रश्न विचारून समोरच्याची बोलती बंद करतात. त्यांची पत्रकारिता ही मुंबईच्या आयबीएन लोकमत न्यूज स्टुडिओत कमी पण एखाद्या बऱ्या वाईट घडलेल्या घटनेच्या ठिकाणी जास्त असते. शेतकरी बापाच्या पोटी ते जन्माला आल्यामुळे शेती, शेतीचे प्रश्न हा त्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. या विषयावर ते आपल्या पत्रकारितेतून सरकारला सडेतोड जाब विचारत असतात. परिस्थिती दुष्काळग्रस्त असो की नुकतेच अति पावसाने शेतकऱ्यांची झालेली दैना असो ते अत्यंत बारकाईने सरकारच्या समोर मुद्देसूद पणे मांडणी करत असतात. त्यातून हवालदील झालेल्या शेतकऱ्यांना जास्तीत जास्त कसा फायदा होईल याचा ते विचार करत असतात. अनेक शेतकऱ्यांच्या पत्नी या विधवा झाल्या, त्यांची लहान लहान मुले ही उघड्यावर पडली त्यांच्या घरी जाऊन स्वतः ते त्यांचं सांत्वन करून त्यांच्या परीने मदत करून वेगवेगळ्या माध्यमातून अशा लोकांना न्याय कसा भेटेल यासाठी ते मनापासून प्रयत्न करतात. असे हे सह्रदयी व्यक्तिमत्व महाराष्ट्राच्या पत्रकारितेमध्ये आहे याचा आम्हा सर्वांना सार्थ अभिमान आहे. प्रश्न शेतीचा असो की राजकीय सामाजिक असो, साहित्य कला क्रीडा संस्कृतीचा असो की स्थानिक प्रश्नाविषयीचा असो,की आंतरराष्ट्रीय असो त्या प्रश्नांच्या मुळाशी जाऊन त्याला योग्य न्याय देणारी टीव्ही पत्रकारिता हे श्री. विलास बडे सर करत असतात. महाराष्ट्रातील गडकोटांची दयनीय अवस्थेबद्दल व महापुरुषांच्या जाती जातीतील वाटणीवरून ते अत्यंत उद्विग्न होतात. ज्या महाराष्ट्राने या भारत देशाला दिशा देण्याचं काम केलं त्या महाराष्ट्राच्या मातीला जातीवादाने पोखरताना बघून ते कमालीचे संतापतात. महाराष्ट्राच्या या महापुरुषांच्या मातीमध्ये जातिवादाने थैमान घातलेले असताना ते कोणत्याही एका जातीचा कैवार न घेता, कोणावरही अन्याय न होता सर्व जनतेला न्याय मिळाला पाहिजे यासाठी ते जीव ओतून,जीव तोडून पत्रकारिता करत असतात. महाराष्ट्रातील विस्कटलेली सामाजिक वीण ही घट्ट जुळावी. आणि महाराष्ट्र हा सामाजिक दृष्ट्या एकसंध रहावा यासाठी ते जीवाचं रान करतात. कोरोना काळामध्ये न घाबरता न डगमगता त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वांना आधार देण्याचा काम केला आणि परवा अति पावसामुळे उद्भवलेल्या पूर परिस्थितीमध्ये झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीला स्वतः त्यांच्या शेतात जाऊन,पाण्यामध्ये उतरून वाचा फोडण्याचं काम केलेल आहे.प्रश्न शेतकऱ्यांचा असो, मच्छीमारांचा असो,लहानसान व्यावसायिकांचा असो की गडचिरोली सारख्या भागामध्ये राहणाऱ्या आदिवासी बांधवांचा असो,की हुंडाबळीचा असो, प्रश्न एसटी कामगारांचा असो की अंगणवाडी सेविकांचा असो की असंघटित कामगारांचा असो या साऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे यासाठी ते आपली पत्रकारिता करत असतात.

श्री. विलास बडे सर यांच्या संपूर्ण पत्रकारितेचा जर बारकाईने अभ्यास केला तर आपणास समजून येईल की त्यांचा मुख्य उद्देश हा केवळ आणि केवळ जनसेवेसाठीची पत्रकारिता हाच आहे.

आत्ता सध्याच्या युगामध्ये पत्रकारितेसाठी अनेक आव्हाने आहेत. सत्ताधारी मग त्यात आत्ताचे असो की पूर्वीचे त्यांना टोकाचे प्रश्न विचारलेले चालत नसतात. सच्चा पत्रकारांना याचा त्रास सहन करावा लागतो .तरी देखील विलास बडे सर यांच्यासारखे अनेक पत्रकार आहेत की ते बलाढ्य सत्ताधीशांची संघर्ष करून आपल्याला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करत असतात. सर्वसामान्य जनतेकडून अशा या प्रामाणिक पत्रकारांना एकच एक अपेक्षा असते की पत्रकार हे दिवस-रात्र कशाची ही अपेक्षा आणि परवा न करता सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नासाठी आपली पत्रकारिता करत असतात. त्यामुळे पत्रकारांना कधी संकटाचा सामना करण्याची वेळ आली असेल तर सर्वसामान्य जनता ही त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभी राहिली पाहिजे. पण दुर्दैवाने असे होताना दिसत नाही अशी खंत देखील ते अनेक वेळा बोलून दाखवतात.

पत्रकारितेची अनेक अंग आहेत, अनेक बाजू आहेत. या सर्व अंगांना आणि या सर्व बाजूंना विलास बडे सर हे प्रामाणिकपणे स्पर्श करून न्यायाची नीतीची पत्रकारिता करत असतात. त्यांच्या या प्रामाणिक निडर पत्रकारीची दखल घेऊन त्यांना अनेक पुरस्कार मिळालेले आहेत.अशा या प्रामाणिक सहरदई टीव्ही पत्रकारिता करत असलेल्या श्री. विलास बडे सर यांना उदंड आयुष्य लाभू दे. त्यांच्या हातून महाराष्ट्राच्या नव्हे नव्हे देशाच्या उद्धाराची पत्रकारिता सतत घडत राहू दे हीच सदिच्छा...

**शब्दांकन...**
**श्री. मारुती देविदास शिंदे.**
**मो.७०८३५६३६५९..**

# शाळा व्यवस्थापनाच्या अध्यक्षपदी अतुल सटाले उपाध्यक्षपदी आण्णा खिलारे



श्री अतुल सटाले



श्री आण्णा खिलारे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चळे/प्रतिनिधी : चळे ता पंढरपूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेची शाळा व्यवस्थापन समिती पुनर्गठीत होवून नूतन पदाधिकारी निवडण्यात आले अध्यक्षपदी अतुल बापू सटले तर उपाध्यक्षपदी आण्णा सिध्देश्वर खिलारे यांची अविरोध निवड झाली.

ही निवड १३ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा चळे येथे आयोजीत पालक सभेत केंद्रीय मुख्याध्यापक प्रभाकर घाडगे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या पालक सभेतून बारा व एक शिक्षण प्रेमी सदस्य निवडण्यात आले. इतर सदस्य पुढील प्रमाणे (महिला प्रतिनिधी) सौ अश्विनी महेश मोर, सौ अबोली रामचंद्र कुलकर्णी, सौ अलका दत्तात्रय माने, सौ.सोनाली लखन वाघमारे, सौ चांदणी श्रीकांत पंडित, सौ लक्ष्मी अमोल रोकडे, सौ जस्मिन रियाज मुलाणी, (पुरूष प्रतिनिधी) श्री महावीर तुकाराम मस्के, श्री जगन्नाथ कोंडीबा शेंबडे, श्री बालाजी संभाजी सरीकतर शिक्षणतज्ञ सदस्यपदी श्री अतुल परमेश्वर मोरे यांची निवड करण्यात आली यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष सज्जन मोरे, नेताजी गायकवाड, गणेश मोरे तसेच सर्व पालक वर्ग उपस्थित होते. या पालक सभेचे प्रास्ताविक श्री शशिकांत कांबळे सर यांनी केले तर सूत्रसंचालन श्री संभाजी माने यांनी केले. पालक सभा यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षकांनी प्रयत्न केले.

# खा.शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त माढ्यात महारोग्य शिबिर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : देशाचे नेते, पद्मविभूषण खा.शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार अभिजीत आबा पाटील यांच्या संकल्पनेतून माढा ग्रामीण रुग्णालय येथे महाआरोग्य शिबिराचे आयोजन केले होते.

याशिबिरात हृदयरोग तपासणी, मधुमेह (Diabetes) व रक्तदाब (BP) तपासणी, स्त्रीरोग व प्रसूतीपूर्व तपासणी,बालरोग तपासणी व समुपदेशन, त्वचा रोग आणि सामान्य औषधोपचार,मोतीबिंदू व नेत्र तपासणी, इत्यादी प्रकारच्या तपासण्या घेण्यात आल्या या तपासण्याबरोबरच औषधे मोफत देण्यात आली या शिबिरात ५१० रुग्णांनी सहभाग नोंदवला.

### ५१० रुग्णांनी नोंदविला सहभाग



आमदार अभिजीत आबा पाटील जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख, यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री सहाय्यता निधी इतर योजनेतून जवळजवळ ३कोटी रुपयांची सहाय्यता रुग्णांना मिळाली याबाबत सर्व उपस्थितांनी आमदार साहेबांचे आभार मानले.

यावेळी उपस्थित तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील, विनंती कुलकर्णी, जिल्हा परिषद सदस्य भारत शिंदे, संजय पाटील, आनंद कानडे, हरिभाऊ रणदिवे सर, बापूसाहेब जाधव, राम मस्के, ऋषिकेश तांबिले, आबासाहेब साठे, बापू तांबिले, सावली बंगाळे, अश्विनी लोकरे, वैद्यकीय अधिष्ठता डॉ.मेमाणे, डॉ.अमित भोसले, डॉ.रणजीत ढोले,डॉ. सुजित गायकवाड, डॉ. पांडुरंग जगताप, डॉ. आलेकर, डॉ.बांगर सर्व तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाचे डॉक्टर नर्सिंग स्टाफ उपस्थित होते.

**आमदार अभिजीत आबा पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून जन्मजात बहिरेपणा असणाऱ्या मुलांची तपासणी करण्यासाठी शिशुकर्णदोष कीट माढा ग्रामीण रुग्णालय येते उपलब्ध झाले आहे याचा फायदा माढा तालुक्यातील नवजात शिशु, लहान बालकांना होईल व त्यांचा बहिरेपणा दूर करण्यासाठी शस्त्रक्रिया करण्यात येईल याबद्दल वैद्यकीय अधिष्ठता डॉ. मेमाने यांनी आभार मानले.**

# ‘स्वामी विवेकानंदांचा मानवी मूल्यांचा प्रसार’ स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : पालघर येथील रामकृष्ण मिशन सकवार यांनी आयोजित केलेल्या 'स्वामी विवेकानंदांचा मानवी मूल्यांचा प्रसार' (ज्ञान यात्रा ) या विषयावर आयोजित केलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल,पालखेड येथील २८० विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

सदर स्पर्धेमध्ये विद्यार्थांनी नेत्रदीपक कामगिरी केली असून यामध्ये अनुक्रमे इयत्ता आठवी अ मध्ये प्रथम शिवम आहेर, द्वितीय सार्थक थेटे, तृतीय शाहू मेधने, इयत्ता आठवी ब मध्ये प्रथम तनिष्का गायकवाड, द्वितीय दुर्वा गांगुर्डे, तृतीय नयना भोगे,इयत्ता नववी अ मध्ये प्रथम श्रुती शिंदे, द्वितीय सृष्टी जाधव, तृतीय अनुष्का थेटे, इयत्ता नववी ब मध्ये प्रथम रुकसाना शेख, द्वितीय शिवकुमार नायक, तृतीय दिपाली गांगुर्डे, इयत्ता दहावी अ मध्ये प्रथम विना थेटे, द्वितीय पूर्वा खैरे, तृतीय साई शेळके, इयत्ता दहावी ब मध्ये प्रथम स्मितल मेधने, द्वितीय भाग्यश्री आहेर,तृतीय श्रावणी शिंदे आदी विद्यार्थ्यांनी यश संपादित केले आहे. सदर यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, वाचनीय पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन मुख्याध्यापक अशोक शेळके व मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

### पालखेडच्या विद्यार्थांची नेत्रदीपक कामगिरी

सदर मिळवलेल्या याच्याबद्दल महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव जोंधळे, उपाध्यक्ष निवृत्ती नाना थेटे, कार्यकारी संचालक दीपक जोंधळे, कार्याध्यक्ष दत्तात्रय जोंधळे, रामकृष्ण मिशन सकवार चे कार्यवाह स्वामी तत्त्वरूपानंद महाराज, संकेत गव्हाणकर,प्रसाद जोशी आदींनी अभिनंदन केले.

याप्रसंगी मुख्याध्यापक अशोक शेळके,निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्धवळे, संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे,राहुल दवते, वैशाली मोते,सागर जाधव,राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव,संजय कोकतरे, कविता ढोमसे,सारिका पवळे,सुरेश गांगुर्डे, रामदास पवार,नदीम तांबोळी आदींसह विद्यार्थी उपस्थित होते,

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

**प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# भिवंडी तालुक्यात तलाठी व मंडळाधिकारी संपावर; महसूल विभागाचे कामकाज पूर्णतः ठप्प

## भिवंडी तहसीलदार अभिजीत खोले यांना दिले निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : नागरिकांना तातडीने ऑनलाईन महसूल सेवा देण्यासाठी आवश्यक असलेली लॅपटॉप, प्रिंटर व इतर डिजिटल साधनसामुग्री त्वरित उपलब्ध करून द्यावी, या प्रमुख मागणीसाठी भिवंडी तालुक्यातील तलाठी व मंडळाधिकारी सोमवार (दि. १५) पासून संपावर गेले आहेत. महाराष्ट्र राज्य तलाठी संघाने डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्रे (डीएससी) प्रशासनाकडे जमा करत आंदोलनाचा पवित्रा घेतल्याने महसूल विभागाच्या क्षेत्रीय स्तरावरील सर्व कामकाज पूर्णतः ठप्प झाले आहे.




ऑक्टोबर २०२५ रोजी जमाबंदी आयुक्त पुणे यांना निवेदन देऊन १५ नोव्हेंबरपर्यंत साधने न मिळाल्यास ऑनलाइन काम काज बंद करण्याचा इशारा देण्यात आला होता . त्यावेळी जमाबंदी आयुक्त, पुणे यांनी २७ ऑक्टोबर २०२५ रोजी निविदा प्रक्रीया पूर्ण होऊन नोव्हेंबर च्या पहिल्या आठवड्यामध्ये प्रत्यक्षात लॅपटॉप व प्रिंटर कम स्कॅनर वाटपास सुरुवात होईल असे संघटना पदाधिकाऱ्यांना आश्वासन दिले होते. परंतु शासन स्तरावर आद-ेश पारीत होऊनही अद्यापपावेतो पुढील कुठलीही कार्यवाही होत नसल्याने राज्यातील ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांच्यासह नाईलाजाने दि.१५ डिसेंबर २०२५ पासून भिवंडी तालुक्यातील सर्व ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी आपापली उद्धउ तह-सील कार्यालयात जमा करून ऑनलाईन कामकाज पूर्णत बंद करुन आंदोलनास प्रारंभ करत असल्याचे निवेदन महाराष्ट्र राज्य तलाठी संघ भिवडी शाखेचे निवेदन भिवंडी तहसीलदार अभिजीत खोले यांना देण्यात आले आहे.

ठाणे जिल्ह्यातील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) आणि मंडळाधिकारी यांना मागील दहा वर्षांपासून नवीन लॅपटॉप व संगणकीय साधनसामुग्री मिळालेली नाही. शासन निर्णयानुसार संगणकीय साहित्याचे आयुर्मान पाच वर्षे निश्चित असतानाही आजही कालबाह्य, नादुरुस्त व निकृष्ट अवस्थेतील उपकरणांवर काम करण्याची वेळ कर्मचाऱ्यांवर आली आहे. परिणामी सातबारा, ८-अ, फ ेरफार नक्कल, ई-हक्क, ई-पिकपाहणी, ई-पंचनामा यांसारख्या महत्त्वाच्या ऑनलाईन सेवा वेळेत देणे अशक्य होत असल्याचा आरोप तलाठी संघाने केला आहे. तांत्रिक अडथळ्यांमुळे प्रशासनिक कामकाज ठप्प झाले असून याचा थेट परिणाम नागरिकांच्या अधिकारांवर होत आहे. शासन निर्णय असू-नही खरेदी प्रक्रिया रखडलेली आहे. याबाबत यापूर्वी दिलेली निवेदने दुर्लक्षित झाल्याने आता परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्र राज्य तलाठी संघ भिवंडी शाखेच्या वतीने भिवंडी तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. त्यामध्ये जी.ई.एम. पोर्टलद्वारे नवीन लॅपटॉप व प्रिंटरची खरेदी प्रक्रिया तात्काळ सुरू करावी, कालबाह्य उपकरणांची विल्हेवाट लावावी तसेच खरेदी प्रक्रियेतील अनावश्यक विलंबाबाबत जबाबदारी निश्चित करावी, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. कार्यालयीन ऑनलाईन कामकाज ठप्प राहिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी शासनाची राहील, असा इशाराही देण्यात आला आहे. यावेळी मंडळ अधिकारी संतोष अगिवले यांच्यासह तलाठी नरसुबाबा तुगावे, निलेश कांबेरे, सुधाकर कामडी, योगेश भोजणे, राहुल चित्ते, गणेश पाटील, सुरेश राठोड, निकिता देशमुख, नेहा शेख, चित्रा विशे, अविनाश राऊत, रमेश सुर्यवंशी, विजय लोहकरे, संजीवनी वानखेडे यांच्यासह तालुक्यातील अनेक तलाठी उपस्थित होते.



# स्वेरीमध्ये 'नॅशनल एज्युकेशन डे' उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर - गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये यंदाचा 'राष्ट्रीय शिक्षण दिन' तथा 'नॅशनल एज्युकेशन डे' उत्साहात साजरा करण्यात आला.

देशात सर्वत्र दि.११ नोव्हेंबर रोजी 'राष्ट्रीय शिक्षण दिन' साजरा केला जातो. भारताचे पहिले शिक्षणमंत्री आणि भारताच्या विकासासाठी दूरदृष्टी असलेले थोर नेते मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्या जयंतीच्या निमि त्ताने देशभरात 'नॅशनल एज्युकेशन डे' चे आयोजन केले जाते. या राष्ट्रीय उपक्रमाच्या अनुषंगाने संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागात स्वेरीच्या 'इन्स्टिट्यूशन इनोव्हेशन कौन्सिल' (आयआयसी), इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग स्टुडंट असोसिएशन (इसा) आणि लाईटनींग लेजंडस् स्टुडंट क्लब (एलएलएससी) यांच्या संयुक्त विद्यमाने या 'नॅशनल एज्युकेशन डे' च्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रेरणादायी म ार्गदर्शन करणारे वक्ते प्रा. इसाक मुजावर हे होते. दीपप्रज्वलनानंतर कार्यक्रमाचे समन्वयक प्रा.सागर कवडे यांनी 'राष्ट्रीय शिक्षण दिना'चे महत्त्व स्पष्ट केले प्रा.मुजावर यांनी आपल्या म ार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, 'देश निर्मितीत शिक्षणाची भूमिका ही सकारात्मक दृष्टिकोन ठेवते. याद्वारे बौद्धिक कौशल्य, प्रेरणा विकसित करणे, कौशल्य विकास व नवोन्मेषाचें महत्व, शैक्षणिक ज्ञान व वास्तविक जीवनात अनुप्रयोग यामधील दरी कमी करणे या महत्वाच्या मुद्द्यावर भर दिला. एकूणच प्रा.मुजावर यांनी बदलत्या जगात शिक्षण, नवोन्मेष, शिस्त आणि वैयक्तिक विकासाचे महत्त्व पटवून सांगितले. या कार्यक्रमात विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग यांनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन प्रा. सागर कवडे यांनी केले तर स्वेरीच्या आयआयसीचे अध्यक्ष डॉ. दिग्विजय रोंगे यांनी आभार मानले.

# चाळीस हजार रुपयाची लाच घेताना उत्तर सोलापूरचे नायब तहसीलदार चंद्रकांत हेडगिरी पुण्याच्या अँटीकरप्शनच्या जाळ्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी/राजेंद्र कोरके पाटील (सोलापूर जिल्हा प्रतिनिधी) :



उत्तर सोलापूर तालुक्यातील नायब तहसीलदार चंद्रकांत काशिनाथ हेडगिरी (वय वर्ष ५२) मंडल अधिकाऱ्याचा पगार काढण्यासाठी ६०००० ची मागणी करून चाळीस हजार रुपयाची लाज घेताना लाच लुपत प्रतिबंधक विभागाचे त्यांना सोमवारी दिनांक १५ डिसेंबर रोजी सायंकाळी सातच्या सुमारास रंगेहात पकडले आहे. विशेष म्हणजे पुण्याच्या अँटी करप्शन विभागाने ही कारवाई केल्याचे समोर आले आहे. त्यांना ताब्यात घेतले असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सदर बाजार पोलीस ठाण्यात चालू आहे. अशी माहिती पोलीस उपाधी-क्षक प्रशांत चौगुले यांनी दिली आहे.

# कर्मवीर ॲडव्होकेट विठ्ठलराव हांडे यांच्या कार्याचा इतरांनी आदर्श घ्यावा : मुख्याध्यापक नितीन भामरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर प्रतिनिधी ( सोमनाथ गिरी) :- घोटी येथील जनता विद्यालयात मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे भूतपूर्व सभापती कर्मवीर डव्होकेट विठ्ठलराव हांडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक नितीन भामरे होते. व्यासपीठावर उपमुख्याध्यापक उल्हास पवार, पर्यवेक्षक हिरामण चौधरी,अविनाश निकम,हेमंत झोले ,नामदेव सरगर, अपर्णा उईके, अनिता राठोड, देवयानी




जगताप, सोमनाथ गिरी आदी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते कर्मवीर ड. हांडे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ड यांच्या जीवन व कार्याविषयी तेजस्विनी साळवे विद्यार्थीनी माहिती दिली.

यावेळी बोलतांना कार्यक्रम ाचे अध्यक्ष व विद्यालयाचे मुख्याध्यापक नितीन भामरे म्हणाले की, डव्होकेट हांडे यांनी मविप्र संस्थेसाठी अतिशय मोलाचे योगदान दिलेले आहे. त्यांचे शेतीविषयक, सामाजिक, सहकार, राजकीय, शैक्षणिक आदींसह सर्वच क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय असून त्यांच्या कार्याचा इतरांनी आदर्श घ्यावा असे आव्हान मुख्याध्यापक भामरे यांनी केले. सूत्रसंचालन कुम ारी स्वानंदी जाधव हिने केले.तर आभार उपशिक्षिका वंदना जाधव यांनी मानले. यावेळीशिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# 'शब्द शक्ती' २०२६ दिनदर्शिकेचे प्रकाशन; लोककल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती एकाच ठिकाणी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव :२०२५ हे वर्ष काही दिवसांत संपत असून नव्या २०२६ वर्षाच्या स्वागताच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या यादीवरील अधिकृत साप्ताहिक 'शब्द शक्ती' यांच्या वतीने 'शब्द शक्ती' २०२६ या दिनदर्शिकेचे प्रकाशन माजी केंद्रीय पंचायतराज मंत्री कपिल पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या दिनदर्शिकेचे प्रकाशक व संपादक भगवान चंदे असून, प्रकाशन सोहळ्याला महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष तथा 'शब्द शक्ती'चे संपादक भगवान चंदे, जिल्हा सहसचिव मिलिंद जाधव, भिवंडी तालुका अध्यक्ष मेघनाथ विशे, शहापूर तालुका अध्यक्ष संजय भालेराव, कल्याण तालुका अध्यक्ष योगेश गोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी 'शब्द शक्ती' परिवाराला शुभेच्छा देत ही दिनदर्शिका सर्वसामान्य नागरिकांसाठी मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

'शब्द शक्ती' २०२६ ही दिनदर्शिका एकूण २४ पानांची असून त्यामध्ये विविध विषयांवरील उपयुक्त माहितीचा समावेश करण्यात आला आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती, आरोग्यविषयक मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त माहिती, छत्रपती शिवाजी महाराजांच्या माहुली गडाच्या इतिहासातील पाऊलखुणा, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वाटचालीतील घडाम ोडी, ठाणे जिल्ह्यातील उपक्रम, न्यायालयीन कामकाजातील जनहिताशी संबंधित उपक्रम तसेच शहापूर तालुक्यातील स्वातंत्र्यसैनिक किसानबाबा भेरे यांच्या जीवनावर आधारित माहिती या दिनदर्शिकेत देण्यात आली आहे.

ही दिनदर्शिका सर्वसामान्य नागरिकांसह विद्यार्थी, पत्रकार आणि विविध क्षेत्रांतील वाचकांसाठी उपयुक्त ठरणार असल्याचे मत महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष भगवान चंदे यांनी व्यक्त केले. विविध उपयुक्त माहितीनं समृद्ध असल्यामुळे 'शब्द शक्ती' २०२६ दिनदर्शिकेला आजप-ासूनच मोठी मागणी असून नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

### एकाच बेंच वरील वर्गमित्र मैत्रिणी परत एकत्र

### अनेक मित्र - मैत्रिणीच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या

# तब्बल २९ वर्षानंतर पुन्हा जमली गट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा /प्रतिनिधी

स्वातंत्र्यानंतर स्थापन झालेल्या उमरगा शहरातील आदर्श विद्यालयातील हजारो विद्यार्थ्यांनी देश विदेशात विविध क्षेत्रात कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. १९९५ - १९९६ या वर्षातील दहावीचे वर्गमित्र - मैत्रिणी तब्बल २९ वर्षांनी रविवार दि. १४ रोजी येथे झालेल्या स्नेहमेळाव्यात एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा देत गुरुजनाविषयी आदर व्यक्त केला.

कार्यक्रम उमरगा शहराजवळील लातूर रोड लगतच्या बिरूदेव मंदीरासमोरील हॉटेल एम बी रिसॉर्ट मध्ये रविवारी १४ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने करण्यात आली. दिवंगत मित्र मैत्रिणी व गुरुजनांना यावेळी आदरांजली वाहण्यात आली. परिचय देताना अनेकांनी आपल्या यशस्वी कारकिर्दीच्या कथा सांगितल्या तर अनेकांनी शालेय व जुन्या आठवणींना उजाळा देत भावूक झालेले दिसून आले. दिवसभर मनोरंजक कार्यक्रम, शाळेच्या काळातील गाढवाचे शेपूट, मटकी फोड, संगीत खुर्ची, व्हॉली बॉल, गाण्यांच्या भेंड्या असे खेळ खेळले गेले. सर्व मित्र मैत्रिणींनी ग्रूप डान्स तसेच एकमेकांचा परिचय करुन आनंद घेतला. सर्वांनी आपला नवा परिचय देत आपल्या कलागुणांचे सादरीकरण केले. यात विवेक तपसाळे यांनी सुमधुर आव-ाजात गाणे सादर करून कार्यक्रमाचा गोडवा वाढविला.

माधुरी तडकले, अबोली नाईक, भाग्यश्री पाटील, ज्योती भांडेकर, राजश्री पाटील, सुलक्षणा पाटील, आरती ठाकूर, संजीवनी पाटील, अनिता मनगुळे, रूपाली शेळके, चंद्रदीप जाधव, शिवशंकर दंडगे, विवेक तपसाळे, लक्ष्मण पवार, प्रेमनाथ सरवदे, देवीदास भोसले, नेताजी ओवांडकर, किशोर नागदे, बालाजी जाधव, दिपक सुर्यवंशी, व्यंकट धुमाळ, संतोष हेबळे, राहूल दिवटे, संजय शेवाळे, धनराज मुळे, दयानंद जाने, सिताराम स्वामी सर्वांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दिपक सुर्यवंशी व मिरा भोसले - चव्हाण यांनी केले. प्रास्ताविक लक्ष्मण पवार यांनी केले तर आभार प्रदर्शन रूपाली शेळके यांनी केले.

सर्व शालेय मित्र मैत्रीणी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आता आयुष्यातील शेवटच्या टप्प्यापर्यंत दरवर्षी एक दिवस पहिल्या टप्प्यातील मित्र मैत्रिणी ना देण्याचे वचन घेतले -- रुपाली शेळके पुणे.

एकाच बेंचवर बसून जीवनाचे सप्तरंगी स्वप्न रांगविणारे मित्र मैत्रीणी मोठ्या संख्येने एकत्र आल्याने खूपच आनंद झाला - चंद्रदीप जाधव वापी गुजरात.

आज ही काही बाल मित्र मैत्रिणी एकमेकांच्या दुःखात सहभागी होतात हे ऐकून मन भारा-वून गेले. - प्रा. डॉ. दिपक सुर्यवंशी कोल्हापूर.

इतक्या वर्षांनी सर्व मैत्रिणींची भेट झाली, दिवसभर खुप मस्ती




केली. सर्वांचा आनंद गगनात मावेनासा होता. --- नेताजी ओवांडकर माकणी.

शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली जिवनात सुखरूप वाटचाल सुरू असून अजूनही शाळेत जाऊन बालपणाचे गोडवे गावे असे वाटते. ---- प्रेमनाथ सरवदे पुणे.

गुरुजनांच्या संस्काराच्या शिदोरीमुळे आम्हा मित्र मैत्रिणींना आदर्श जीवन शैलीचा मार्ग मिळाला -- मिरा भोसले - चव्हाण.

सुखद आठवणी, चेहऱ्यावर हसू फुलविणारे मजेशिर प्रसंग, डोळ्यात आसू आणणाऱ्या हयात नसलेल्या मित्र मैत्रिणींच्या, शिक्षकांच्या दुःखद आठवणी, एकमेकांच्या खोड्या, लटक्या तक्रारी अशा विविध रंगांनी, चवीने भरलेला हा गेट टुगेदर चा दिवस सर्वांनाच एक वेगळी ऊर्जा देऊन गेला. मैत्रीच्या या न संपणाऱ्या उर्जेने आपले जीवन रिचार्ज करण्यासाठी दरवर्षी भेटणे हे आवश्यक आहे.

# सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे मानव-श्वान संघर्ष टाळण्यासाठी संबंधित विभागांनी कार्यवाही करावी

## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद; जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा प्राणी क्लेश समितीची बैठक संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : सर्वोच्च न्यायालयात सु- मोटो रिट याचिका क्रमांक ५/ २०२५ याचिका प्रमाणे मानव श्वान संघर्ष टाळण्यासाठी उपायोजना करण्याबाबत निर्देशित केलेले आहे. तरी महापालिका, नगरपालिका व ग्रामपंचायत स्तरा-वरील सर्व संबंधित विभागांनी या अनुषंगाने उपायोजना करून त्याबाबतचा अहवाल त्वरित सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित जिल्हा प्राणी क्लेश समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. विशाल येवले, जिल्हा शल्य चिकत्सक डॉ. वर्षा डोईफोडे, सहाय्यक आयुक्त नगरपालिका योगेश डोके, सोलापूर महापालिकेचे डॉक्टर सतीश चौगुले, उपशिक्षणाधिकारी प्राथमिक रूपाली भावसार, मोटर वाहन निरीक्षक राजन देसाई, पशुसंवर्धन विभागाचे डॉ. डी. ए. गिड्डे व अन्य संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणा-ले माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे सोलापूर जिल्ह्यातील भटके श्वान तसेच जनावरे यांच्यासाठी महापालिका, नगरपालिका तसेच ग्रामपंचायत स्तरावर शेल्टर उभा करावेत. यासाठी आवश्यक निधी संबंधित विभागाच्या मुख्यालयाकडून प्राप्त करून घ्यावा. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे उपायोजना करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल प्रशासनाला सादर करावा, असे त्यांनी सूचित केले.

सोलापूर महापालिका हद्दीत सुमारे ४०,००० भटकी कुत्रे असून सन २०२३ रोजी पासून १५,८८४ भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण केल्याची माहिती डॉक्टर सतीश चौगुले यांनी दिली. सद्यस्थितीत भटक्या कुत्र्यांसाठी दोनशे कुत्र्यांची क्षमता असलेल्या शेल्टरची व्यवस्था केलेली असून किमान २००० कुत्र्यांच्या निवाऱ्याची सोय होईल असे एक शेल्टर प्रस्तावित असल्याचें त्यांनी यावेळी सांगितले. तर सहाय्यक आयुक्त नगरपालिका प्रशासन श्री. डोके यांनी बार्शी पंढरपूर या नगरपालिकेंनी भटक्या कुत्र्यांसाठी शेल्टर केलेले असून इतर नगरपालिकानी जागा निश्चित केलेली आहे, परंतु शेल्टर साठी निधीची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी नगर विकास विभागाकडे निधी मागणी केल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

प्रारंभी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉक्टर येवले यांनी माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या सु मोटो रीट याचिकेप्रमाणे जिल्हास्तरावरील सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी करावयाच्या उपायोजनाची माहिती दिली. जिल्ह्यातील सर्व सरकारी आणि खाजगी रुग्णालय यांनी नेहमीच अँटी रेबीज लस आणि इमिनोग्लोबिलीनचा अनिवार्य साठा ठेवणे आवश्यक असल्याचे सांगितले. भटक्या श्वानांना पकडून निर्बीजीकरण, लसीकरण करणे त्यांच्यासाठी आश्रय/ निवाऱ्याची सोय, भटक्या श्वानांना खाऊ घालण्याच्या जागा निश्चित करणे, भटक्या श्वानांच्या व्यवस्थापनासाठी मानक कार्यप्रणाली तयार करून त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचेही त्यांनी सांगितले.

---

# शेडोळ करांनो सकाळचा व्यायाम व योगा करा निरोगी रहा



### सरपंच स्वरुप धुमाळ यांचे प्रतिपादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधी/अमर जाधव : निलंगा तालुक्यातील शेडोळ येथील अनेक लहान मुलं तरुण व नवयुवक दररोज सकाळी व्यायामासाठी व रनिंग साठी जातात शेडोळचे सरपंच स्वरूप धुमाळ यांच्या सुसज्ज संकल्पनेतून व लहान लहान मुलांना रनिंग करताना व व्यायाम करताना पायाला इजा होऊ नये यासाठी बुटाचे वाटप करण्यात आले.

### शेडोळचे सरपंच स्वरुप धुमाळ यांच्या वतीने सकाळचा व्यायाम करणाऱ्यांना श्युज वाटप

शेडोळ गावच्या विकासात मोलाचं योगदान देत असताना ग्रामपंचायतच्या माध्यमातून धुमाळ यांनी अनेक लोकोपयोगी उपक्रम राबवत गावच्या विकासात गाव सुजलाम सुफलाम करण्याचं स्वप्न पाहिल्याने जे जे नवं तेथे शेडोळ गा-वला हवं या संकल्पनेतून शेडोळ गावचा होत असलेला सर्वांगीण विकास व शेडोळ गावातील विकासासोबतच गावच्या जनतेचा शारीरिक विकास व्हावा या संकल्पनेतून दररोज सकाळच्या व्यायामला ग्रामस्थांना प्रोत्साहित करून आपण स्वत व्यायामला जात अनेक तरुणांना व्यायामाची सवय लावणे व लहान लहान चिमुकल्यासह सर्वांनी व्यायाम करावा असा संदेश देत लहान चिमुकल्यांना व तरुण युवकांना व्यायामाची सवय लावणे यासाठी स्वरूप धुमाळ आग्रही आहेत आज सरपंच स्वरूप धुमाळ यांच्या वतीने जे व्यायामला ग्रामस्थ येतात त्यांना श्युजचे वाटप करण्यात आले.

यावेळी शेडोळ गावचे प्रथम नागरिक सरपंच स्वरूप धुमाळ संजय धुमाळ, शंकर कुंभार, दगडू कुंभार, शाहुराज धुमाळ, नारायण क्षीरसागर, गोविंद जाधव, खंडेराव धुमाळ, भास्कर सूरवसे, दिगंबर धुमाळ गोविंद आप्पा धुमाळ, आविनाश ईगवे, रंगराव धुमाळ विकास धुमाळ, सह शेडोळ ग्रामस्थांची उपस्थिती होती

---

# पत्रकार सोमनाथ खंडागळे यांना छत्रपती संभाजी राजे कार्य गौरव राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**माढा येथे दि.२१ डिसेंबरला पुरस्काराचे वितरण होणार आहे.**

अकलूज/प्रतिनिधी : माळशिरस तालुक्यात पत्रकारिता बरोबर विविध सामाज उपयोगी उपक्रम राबवून उल्लेखनीय कार्य करणारे सोमनाथ खंडागळे यांच्या कार्याची दखल घेऊन माढा येथील शंभू सेना यांच्या वतीने राज्यस्तरीय छत्रपती संभाजी राजे कार्य गौरव पुरस्कारसाठी निवड करण्यात आली आहे.

लहानपणापासून समाज सेवा करण्याची आवड आहे तसेच प्रतिकूल परिस्थितीशी सामाना करत गेली अनेक वर्षांपासून विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम केले आहे. जिल्हा परिषदेच्या विविध मराठी शाळेतील मुलाना २६ जानेवारी व १५ ऑगस्ट तसेच महापुरुषांच्या जयंतीनिमित्त लहान मुलाना खाऊ वाटप व शालेय सहित्य वाटप करणे कोरोनाच्या काळात वृध्दआश्रमात व बाल आश्रमात गोरगरीबाना धान्य वाटप केले.शिक्षक, वकील, डॉक्टर, पत्रकार, कला, क्रीडा तसेच विविध क्षेत्रातील उल्लेखनिय कार्य करणाऱ्या व्यक्तीचा साहित्यरत्न अण्णाभाऊसाठे यांच्या जयंती निमित्त राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मान करणे व तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफ़त वाचनालय स्वखर्चातून चालवणे इत्यादी सामाजिक कार्य केले असून अजून ही समाज कार्य चालूच आहे.या त्यांच्या कार्याची दखल घेऊन माढा येथील शंभू सेनाचे संस्थापक अध्यक्ष अतुल नाना पाटील यांनी पत्रकार सोमनाथ खंडागळे यांची छत्रपती संभाजी राजे पुरस्कार २०२५ चा सामाजिक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. पत्रकार सोमनाथ खंडागळे यांच्या या पुरस्कारासाठी झालेल्या निवडीबद्दल माळशिरस तालुक्यातील पत्रकारांमधून अभिनंदनाचा वर्षाव व आनंदाचे वातावरण पसरले आहे.

---

# वाशी येथील ५१ कर्तबगार मातांचा 'राष्ट्रमाता जिजाऊ' पुरस्काराने सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे,दि.१६ वाशी येथील कुलदैवत बहुउद्देशीय सामाजिक संस्था व ज्येष्ठ नागरिक महासंघ, तालुका वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने वाशी येथील कर्तबगार महिलांचा 'राष्ट्रमाता जिजाऊ पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला. आपल्या मुला-मुलींना उच्च शिक्षण देत डॉक्टर, वकील तसेच विविध उच्च पदांपर्यंत पोंहचवीणाऱ्या मातांना शाल, श्रीफळ, ट्रॉफी, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात आले.

याच कार्यक्रमात संस्थेतर्फे दरवर्षी घेण्यात येणाऱ्या गौरी -गणपती आरास स्पर्धेतील विजेत्यांनाही बक्षीस व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्याअध्यक्षस्थानी अजिंक्य विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष एस. एल. पवार सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसीलदार (पुरवठा) विद्या राठोड, शिक्षण विस्तार अधिकारी विद्या टेकाळे, ज्येष्ठ नागरिक महासंघ धाराशिव जिल्हाध्यक्ष महादेव महाराज आडसूळ व ज्येष्ठ पत्रकार माधवसिंह राजपूत कळंब उपस्थित होते. उपस्थित प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कार व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी कार्यक्रमात कर्तबगार माता सुपुत्र गितेश रमेश गुंड (इंजिनिअर, जर्मनी) तसेच नाझिमा आझाद मुजावर यांनी महिलांना मार्गदर्शन केले. मुजा-




वर यांनी कॅन्सर झाला आहे हे कळाल्या नंतर देखील मोठ्या धैर्याने याचा सामना केला व यावर विजय मिळविला या विषयीची माहिती दिली व वेळीच तपासणी व उपचार केल्यास कॅन्सर बरा होतो यासाठी वेळेवर उपचार घेण्याचे आवाहन केले. प्रमुख पाहुणे विद्या राठोड, महादेव महाराज आडसूळ,ज्येष्ठ पत्रकार माधवसिंह राजपूत व एस. एल. पवार यांनी आपल्या भाषणात आई-वडिलांचे कष्ट, प्रेम व ममता अमूल्य असून कुलदैवतसंस्था व ज्येष्ठ नागरिक महासंघाने मातांच्या कार्याची दखल घेऊन योग्य सन्मान केल्याचे गौरवोद्गार काढले. या कार्यक्रमात गौरी गणपती आरास स्पर्धेतील परीक्षकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास भास्कर चेडे सर, लक्ष्मण शेरकर, नरसिंह अण्णा उंदरे, पांडुरंग नाना कवडे, लक्ष्मण घुले, एम. आय. मुजावर, दादासाहेब लगाडे, प्रा. विनोद पवार, तवले, प्रा. शहाजी चेडे, नगरपंचायत विकास पवार, साळुंखे, उंदरे, अदि मान्यवर नागरिक उपस्थित होते.

सुत्रसंचलन बजरंग शिक्षण प्रसारक मंडळ सिन्नर संस्थेच्या अध्यक्ष साधना विश्वेकर, यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तानाजी मोळावणे,बळीराम जगताप, बळीराम कवडे, सुधाकर देवडकर या जेष्ठ नागरिकांनी सक्रिय सहभाग घेतला.

---

### कासेगावनगरी भक्तांनी फुलली; मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर बॅरिकेड

# पंढरपूर तालुक्यातील कासेगावांत यल्लमा देवीच्या यात्रेसाठी दोन लाख भाविक दाखल







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनीधी :

पंढरपूर तालुक्यातील कासेगाव येथील जागृत दैवत अशी ओळख असलेल्या श्री यल्लमा देवीच्या यात्रेसाठी महाराष्ट्र राज्यातून तसेच आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक या राज्यातून दोन ते अडीच लाख भाविक दाखल झाले आहेत. श्री यल्लमा देवीच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांची गैरसोय होऊ नये आणि कोणताही अनुसूचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस प्रशासनाच्या वतीने मंदिराकडे येणाऱ्या सर्व रस्त्यावर बॅरिकेड लावण्यात आले. सर्व चार चाकी व तसेच दोन चाकी वाहनांना मंदिराकडे प्रवेश बंद करण्यात आला आहे. त्या सर्व वाहनांची पार्किंगमध्ये व्यवस्था करण्यात आली श्री रेणुका माता- मानाचा लिंबगंध पाहण्यासाठी भाविकांची गर्दी यावेळी कासेगाव चे मानकरी भाऊसाहेब देशमुख यांचाही मानाचा नैवेद्य देवीला दाखवून आल्यानंतर मानाचा लिबगंध हा श्री यल्लमा देवीचे यात्रेत विशेष करून मानाचा लिंबगंध आणि नैवेद्य पाहण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी असते लिंबगंध कासेगाव चे मानकरी वसंतराव देशमुख यांचे सुपुत्र संग्रामसिंह देशमुख याचा असतो.

असून तेथून सर्व भाविक भक्तांना मंदिराकडे पायी चालत जावे लागत आहे. मंदिर परिसरात तसेच सर्व चौकात मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. यात्रेत येणाऱ्या भाविकांच्या मनोरंजनासाठी पाळणे व खेळण्याचे स्टॉल लावण्यात आले आहेत. तसेच हॉटेल आणि छोट्या-मोठ्या दुकानदारांनी आ-पले दुकाने थाटली आहेत.

चोख पोलीस बंदोबस्त : यात्रेसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून भाविकांच्या सोयीसाठी जादा बसेस सोडण्यात आले आहेत. पंढरपूर तालुक्याचे पोलीस निरीक्षक टी वाय मजावर यांच्याकडूनही यात्रेतील भाविकांची गैरसोय होऊ नये आणि कोणत्याही प्रकारचा अनुसूचित प्रकार घडू नये म्हणून चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



आज अप्पर येथे कर्नाटकातील आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ नेते अन्याय अत्याचाराविरोधात कर्नाटकात रान उठवणारे मा. प्रकाश मूलभारती आले असता बुद्धविहार येते सुनील गायकवाड यांच्या वतीने त्याचे स्वागत करून सत्कार करण्यात आला. त्यावेळी बसवराज बनसोडे, हुचप्पा होसमनी, मल्लेश शिंगे, हनुमंत निंगदळी, चंद्रकांत आतुर, अविनाश गायकवाड, सर्व पदाधिकारी उपस्थित होते.